# पर्यावरण व विस्थापन

## चन्द्रशेखर पुरन्दरे

### शहरीकरण

पारंपारिक ग्रामीण वसतीस्थान सोडून शहरात स्थायिक होणाऱ्या लोकांची संख्या जगभर वाढत आहे. पाण्याचे वाढते दुर्भिक्ष्य, त्यामुळे शेती कठीण आणि समुद्राची वाढती पातळी ही या विस्थापनामागे प्रमुख कारणे असतात. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार २०५० पर्यन्त आफ्रिका, पूर्व युरोप, आशिया, दक्षिण अमेरिका खंड यातील सुमारे साडेचार कोटी ते सव्वा–एकवीस कोटी लोक या कारणांनी देशांतर्गत विस्थापित होतील. ज्यांची शेतीसारखी उपजीविका बंद पडली त्या लोकांना देश सोडून जाणे परवडत नाही. तसेच, पूर व प्रदूषण नियंत्रणाबाबत सरकारे बहुश: निष्क्रिय असतील असेही गृहीत आहे. देशोधडीला लागलेल्यांची संख्या निराळी. प्रामुख्याने युद्धाने ते लोक निर्वासित होतात. भविष्यातील युद्धांचा अंदाज सांगता येत नाही, पण आज जगात १० कोटी विस्थापित आहेत. त्यातील बहुतांश युद्धांमुळे विस्थापित झाले आहेत. म्हणजे त्यात पर्यावरणाच्या हानीने विस्थापित होणाऱ्यांमुळे किमान दुपटीने वाढ होईल.

दुसऱ्या एका (जरा अतिशयोक्त) अंदाजानुसार २१०० सालापर्यंत जर पृथ्वीचे तपमान ४ डिग्रीने वाढले, तर आज ज्या प्रदेशात साडे–तीन अब्ज लोक रहात आहेत, तेथे रहाणे त्यांना अशक्य होईल. पर्यावरणवादी चळवळ व राजकीय पक्ष अशा प्रकारच्या अहवालांचा जास्त आधार घेतात.

कोणताही अंदाज ग्राह्य मानला तरी पर्यावरणाची हानी व त्यामुळे विस्थापन सध्याच्या युद्धांपेक्षा गंभीर समस्या आहे.

### नीजेर

नीजेर या आफ्रिकन देशातील शहरीकरण पहाण्यासारखे आहे. निआमे ही नीजेरची राजधानी. ग्रामीण भागातून तेथे मोठ्या प्रमाणावर विस्थापन होते, त्या लोकांना पर्यावरणाच्या हानीचे दुष्परिणाम भोगावे लागले आहेत. अनिश्चित ऋतू, वाढता उन्हाळा, पावसाचा भरोसा नाही किंवा अतिपावसाने पूर, सततचा दुष्काळ इत्यादि कारणांनी शेती शक्य नाही. खाण्याच्या अन्नाची टंचाई होते, गुरे पाळणे कठीण होते. वातावरणाचे तपमान standard deviation च्या एका अंशाने वाढले तर सामाजिक संघर्षाची शक्यता अकरा टक्केने वाढते. नीजेरमध्ये सतत अंतर्गत संघर्ष चालू असतात या २६ जुलैला तर, अध्यक्षाला पदच्युत करून लष्कराने सत्ता ताब्यात घेतली, पण तो विषय निराळा.

ग्रामीण भागातून निआमेला स्थायिक व्हायला नुकत्याच आलेल्या अली नावाच्या माणसाच्या सांगण्यानुसार पाण्यासाठी स्थानिक संघर्ष वाढत आहेत. प्रसंगी हे संघर्ष हिंसक होतात, बंदुका, सुरे, भाले वापरून हत्या होतात. शहरात अशा झगड्यांची शक्यता कमी असते. अलीचे निम्मे खेडेही निआमेला आले. बहुधा असे खेडेच्या खेडे एका वेळी गाव सोडत नाही, एखाद–दोन कुटुंबे गाव सोडतात. त्यावरून तेथील विद्यमान परिस्थितीचा तर्क करता येतो.

हे विस्थापित निआमे शहराच्या बाहेर आहेत. ज्या जमिनीवर ते आहेत, ती त्यांची नाही. म्हणजे सरकारदरबारी हे अनधिकृत अतिक्रमण आहे, त्यामुळे काही वेळा त्यांना हुसकावूनही लावण्यात आले आहे.

तरीही हे लोक नव्या ठिकाणी जम बसवण्याचा प्रयत्न करत आहेत. शहरात या लोकांना काही ना काही काम मिळते. उदा. एका गुराख्याला गावात कामच राहिले नव्हते, खाण्याची भ्रांत असे, तो शहरात आता गवंडीकाम करतो. अनेक लोक त्यांची गुरे चरायला शहराबाहेरच्या कुरणात घेऊन जातात आणि दारोदार जाऊन उरलेला, वाया जाणारा भाजीपाला गोळा करतात. तो गुरांना खाऊ घालतात.

### शहराकडे

जगभर विकसनशील देशांत असे आढळते, की शहरात दारिद्र्य कमी असते, पगार जास्त असतात आणि बहुतेक नोकऱ्या पर्यावरणातील बदलांवर अवलंबून नसतात. केनियातील एका अभ्यासात असे आढळून आले की बऱ्याचदा शहरात पगार किती असतो, म्हणजे, किती जास्त असतो, याचीच माहिती

ग्रामीण जनतेला नसते – अशा अज्ञानात पर्यावरणाच्या बिघाडाने विस्थापन भाग पडले, तर ती इष्टापत्तीच ठरते. दुसरा एक अभ्यास आईसलंडमध्ये झाला. तेथे एका बेटावर ज्वालामुखीचा उद्रेक झाला. ज्यांची घरे जळाली त्यांना शहराला जावेच लागले, इतरांना नाही. या दोन गटांतील मुलांची तुलना करण्यात आली. जे शहराला गेले त्यांचे शिक्षण मागे राहिलेल्यांच्या मुलांपेक्षा जास्त झाले, उत्तरायुष्यात त्यांची कमाईही जास्त झाली.

शहराला येणाऱ्या मुलांची शालेय शिक्षणाची शक्यता जास्त असते कारण एकतर शाळा जवळ असतात आणि शहरातील नोकऱ्यांसाठी औपचारिक शिक्षण आवश्यक असते. परत नीजेरकडे वळता, तेथील ग्रामीण मुलांपेक्षा दुप्पट संख्येने शहरी मुले प्राथमिक शिक्षण घेतात तर त्यापुढचे माध्यमिक शालेय शिक्षण चौपट संख्येने.

शहरांमध्ये आरोग्यसेवाही सुकर असते. दवाखाने, केमिस्ट्स जास्त असतात. शहरी सांस्कृतिक जीवन निराळे असते. खेड्यांमध्ये, विशेषत: स्त्रियांवर अनेक निर्बंध असतात. ते शहरात सैल होतात.

शहरीकरणाने पुनरुत्पादनातही लक्षणीय फरक पडतो. सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील ग्रामीण आफ्रिकेत एक स्त्री सुमारे सहा मुलांना जन्म देते, ती शहरी भागात सुमारे चारपेक्षा कमी मुलांना जन्म देते. यामागे बालमृत्यूचे प्रमाण शहरात कमी असणे हा एक घटक असतो. दुसरा म्हणजे, जास्तीचे मूल म्हणजे त्याचे पोषण, शाळेची फी वगैरे खर्च. ग्रामीण भागात, जास्तीचे मूल म्हणजे, काम करायला जास्तीचे दोन हात अशी धारणा असते.

### देशांचे धोरण

तरीही जगातले निम्मे देश खेडे–ते–शहर हा प्रवास अवघड किंवा अशक्य करतात. इजिप्तमध्ये पाणी कमी झाल्याने शेतकरी कैरो या राजधानीला यायचा प्रयत्न करतात. तेथे त्यांना अनिश्चित नोकरी, रहायला परवडणारी जागा नसते. मग अनेकजण घर ते शहर हा चार–पाच तासांचा प्रवास रोज करतात. चीनमध्ये शहरवासीयांना मिळणाऱ्या अनेक सार्वजनिक सेवा ग्रामीण भागातून आलेल्यांना मिळत नाहीत. त्यामुळे लोक मजुरीसाठी शहरात येतात पण मुले खेड्यातच रहातात, तिथल्या कमी दर्जाच्या शाळातच शिकतात. हाच प्रकार इथिओपिया, इंडोनेशिया, व्हिएतनाममध्ये आहे.

वस्तुत: शहरीकरणाची अनिवार्यता लक्षात घेऊन सरकारांनी खेडे–शहर हा प्रवास स्वस्त करायला हवा, ग्रामीण जनतेला शहरातील संधी व पगार यांची माहिती देऊन त्यासाठी प्रशिक्षण द्यायला हवे. या लोकांना सध्याच्या ज्या सरकारी सवलती, भत्ते मिळतात, ते शहरात आल्यावरही चालू राहिले पाहिजेत. असा विचार पुढे येत आहे.

आपल्याकडे शहरीकरणावर दोन विचार झालेले आहेत. खेडे ही आदर्श व्यवस्था, शहरीकरण नको (गांधी) किंवा खेडे हे दलितांचे शोषणस्थान – म्हणून त्यांनी शहराला जावे (आंबेडकर) ‘तेव्हा गांधींचे ऐकले असते तर आज ही वेळ येती ना!’ हा शब्दच्छल आहे, त्याने सांप्रत प्रश्नाला उत्तर मिळत नाही. तसेच, विशेषत: निवासस्थानाबाबत शहरातही जातीव्यवस्था शाबूत रहाते असे काही अभ्यासात आढळले आहे. बदलत्या पर्यावरणाने अतिविक्राळ प्रमाणावर विस्थापन ही आज वस्तुस्थिती आहे. ती समजण्यास या दोन्ही चौकटी अप्रस्तुत आहेत.

### इतर विस्थापन

समुद्राची पातळी वाढत असल्याने किनाऱ्यावरील मानवी वस्ती धोक्यात येते. ही वस्ती पाण्याखाली येण्याआधी ती हलवायची झाल्यास, किती खर्च येईल असा एक अभ्यास झाला आहे. त्यानुसार जगातील फक्त १३ टक्के समुद्र किनारा काही ना काही मार्गाने वाचवणे शक्य आहे. पूर्व अमेरिका, युरोप, पूर्व आशियातील संपन्न व दाट लोकवस्तीचे काही प्रदेश अशा किनाऱ्यावर आहेत. एकूण चित्र पहाता आजचा ६५% किनारा समुद्राखाली जाणार हे नक्की. तो वाचवण्याचा प्रयत्न खर्चाच्या दृष्टीने परवडण्यासारखा नाही. म्हणजे हे आगामी विस्थापन.

उदा. बांगलादेशाला समुद्रापासूनचा हा कायमचा धोका आहे. शिवाय तेथे प्रचंड वादळे येतात, नद्यांना पूरही येतात. वादळ अल्पावधीत शमते तरी पण शेतजमीन पाण्याखाली गेली तर गेलीच. बहुतेक बांगलादेश सपाट असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. २०५० पर्यन्त तेथे ७० लाख ते दोन कोटीहून जास्त लोक अंतर्गत विस्थापित होतील असा जागतिक बँकेचा

**(पान २८ वर)**

**(जगभर : पान २५ वरुन)**

अंदाज आहे.

आजवर या समस्येवर पूर्वसूचना, बांध घालणे, वादळापासून सुरक्षा म्हणून कॅम्प्स उभारणे वगैरे उपाय सरकारने केले व बळींची संख्या लाखातून शेकड्यात आणली, हे स्तुत्य. इतर उपाय म्हणजे, अशा ठिकाणी वास्तव्यावर निर्बंध आणणे, लोकांना पर्यायी जमिनी देणे, काही मोबदला देणे इत्यादि. ते प्रत्येकवेळी यशस्वी होतातच असे नाही.अनेकदा लोक रोख मोबदला घेऊन शहराला जायचे ते गेलेच. अनेकदा लोकांना अपिरिचित ठिकाणी काहीही माहिती न देता पाठवले गेले, तेथे त्यांना नवीन जमिनी व घरे दिली पण लोकांना तेथे रहायचेच नव्हते. मग ते मूळच्या ठिकाणी गेले तर त्यांच्या जमिनी विकल्या गेल्या होत्या आणि आपल्याच आधीच्या जमिनीवर मजुरी करायला लागली. यावरून विस्थापन व पुनर्वसन हा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे हे लक्षात यावे.

कॅनडातील, अमेरिकेतील, युरोपमधील सध्याचे वणवे व वाढलेले तपमान ; युरोप, जपान, चीन, आपल्याकडचे अलिकडचे जलप्रलय; मेक्सिको, जपानमधील वादळे या संकटांना सामोरे जायला व्यक्ती सोडाच, समूहही अपुरे असतात. मग परत परत देश अग्निशामक दलांकडे, लष्कराकडे वळतात आणि तात्पुरते तोकडे उपाय योजतात.

(भारतीय चिंतनाचा उल्लेख सोडता लेख प्रामुख्याने The Economist च्या अभ्यासावर आधारित आहे..)

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk